MHRG190008292023

:: <u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.११५/२०२० मधील निशाणी क्र.१७ वरील आदेश</u> ::

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश १, नियम १० अन्वये त्यांना प्रस्तुत भुसंपादन निर्देशन अर्जामध्ये समाविष्ट करुन घेण्याबाबत विनंती केली आहे.

०२. अर्ज व अर्जाला मुळ अर्जदारने दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही पक्षाच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०३. अर्जदाराचे कथन की, प्रस्तुतचा अर्ज प्रस्तावित अर्जदार श्रीमती इंदुबाई शांताराम आंबडकर पुर्वाश्रमीची इंदुबाई विश्वास दासगावकर उर्फ देसाई, श्रीमती भागीबाई गुणाजी दासगावकर उर्फ देसाई, किरण सुर्यकांत दासगावकर उर्फ देसाई, आयुष सुर्यकांत दासगांवकर उर्फ देसाई, सुरेखा सुर्यकांत दासगावकर उर्फ देसाई, सविता कृष्णा दासगावकर उर्फ देसाई, राजु बाळू दासगावकर उर्फ देसाई आणि अश्विनी अशोक नागावकर पुर्वाश्रमीची सुमा बाळू दासगावकर उर्फ देसाई यांना पक्षकार म्हणुन सामील करण्यासाठी दाखल केला आहे.

०४. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, मुळ अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज सपांदित जमीन मिळकतीची नुकसान भरपाईची रक्कम

मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्या मिळकतीमध्ये प्रस्तावित अर्जदार यांचासुध्दा हिंदु वारसा अधिनियमाप्रमाणे कायदेशीर हिस्सा असताना मुळ अर्जदार चंद्रकांत सुरेश दासगावकर उर्फ देसाई वगैरे ८ यांनी भुसंदर्भ अर्जामध्ये खोटे दिशाभुल करणारे कथन करुन अर्ज दाखल केला आहे. प्रस्तावित अर्जदार हे नुकसान भरपाईची रक्कम घेण्यासाठी कायदेशीररित्या हक्कदार व पात्र असतानासुध्दा त्यांना भुसंदर्भ अर्जामध्ये जाणीवपुर्वक पक्षकार म्हणुन सामील केलेले नाही व प्रस्तावित अर्जदार यांचा हिस्सा गिळंकृत, हडप करण्याचा प्रयत्न केला असल्याने प्रस्तावित अर्जदार यांनी त्यांना सामनेवाले म्हणुन समाविष्ट करण्याची परवानगी मागितलेली आहे. प्रस्तावित अर्जदार यांच्यादेखील भोमजई, ता.महाड, जि.रायगड येथील सर्वे नं.३११, ३१४अ, ३१४ब आणि ३१४क या मिळकती नागेश्वरी लघुपाटबंधारे योजना, बुडीत क्षेत्रासाठी संपादित करण्यात आलेल्या आहेत. सदर संपादित मिळकती या सामनेवाला क्र.३ यांना शासनातर्फे हस्तांतरीत करण्यात आलेल्या असुन न्यायालयीन निर्णयामुळे दयावा लागणारा मोबदला अथवा वाढीव मोबदल्याची नुकसान भरपाईची रक्कम देण्याची जबाबदारी सामनेवाला क्र.३ यांचेवर आहे तसेच सामनेवाला क्र.१ ते ३ शासनाचे अधिकारी असल्याने सर्व स्वतंत्ररित्या व सामूहिकरित्या अर्जदारास देय असलेली नुकसान भरपाई देण्यास कायदयाने बांधील आहेत.

०५. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, प्रस्तावित अर्जदार यांना सदर भुसंदर्भ अर्जाचेकामी सामील करण्याची परवानगी न मिळाल्यास प्रस्तावित अर्जदार यांच्या कायदेशीर हिश्याची रक्कम फक्त मुळ अर्जदार यांनाच मिळेल व त्यामुळे प्रस्तावित अर्जदारांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल याउलट त्यांना समाविष्ट करुन घेतल्यास त्याच्या हिश्श्याची

रक्कम मिळेल व मुळ अर्जदारांचे कोणतेही नुकसान होणार नाही सबब प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

०६. प्रस्तुत अर्जास विरोध करताना मुळ अर्जदाराचे कथन की, प्रस्तुत अर्ज हा कायदयाने चुकीचा आहे. अर्जदार हे विशेष भुसंपादन अधिकारी यांचेसमोर हजर झाले नसल्यामुळे त्यांना प्रस्तुत प्रकरणात पक्षकार म्हणुन समाविष्ट करता येणार नाही. अर्जदारांनी त्यांचे हक्क सिध्द करण्यासाठी दिवाणी न्यायालयात जाऊन आपले हक्क सिध्द करावेत व त्यानंतर प्रस्तुतच्या भुसंपादन निर्देशन अर्जात पक्षकार म्हणुन समाविष्ट व्हावे. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०७. अर्ज उभयपक्षाच्या परस्पर विरोधी युक्तिवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुतचा मुळ अर्ज संपादित जमीनीच्या मागणीची वाढीव बाजारभावाची रक्कम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. मुळ अर्जदार यांनी सदर अर्जास आक्षेप नोंदविला आहे. सदर प्रकरणाची पडताळणी केली असता असे दिसुन येते की, प्रस्तावीत अर्जदार हे संपादन प्रक्रियेमध्ये समाविष्ठ नव्हते. प्रस्तावित अर्जदारांना सदर मिळकतीमध्ये हक्क आहे किंवा नाही ही बाब या प्रकरणामध्ये विचारात घेता येणार नाही. प्रस्तावित अर्जदारांनी सदर अनुतोष दिवाणी न्यायालयातुन मिळविणे आवश्यक आहे. एकुणच मुळ अर्जदार यांनी उपस्थित केलेली हरकत तथा आक्षेप लक्षात घेता प्रस्तुत अर्जातील अर्जदार यांचे कथन उचित व न्यायसंगत नाही. याकामी मुळ अर्जदार यांच्या विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरण्यात येतो. सदर निष्कर्षास अनुसरुन खालील आदेश पारित.

४/४**भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.११५/२०२०**
**निशाणी क्र.१७**

**:: <u>आदेश</u> ::**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2025.09.20 17:27:11 +0530

महाड **(श्रीमती एच.आर. जाधव)**
दिनांक २०.०९.२०२५ दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड